I J R S S I S,Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 462-468
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# महिला सक्षमीकरणात बचत गटांची भुमिका एक विश्लेषणात्मक अध्ययन

विठ्ठल निळकंठ ठावरी
अर्थशास्त्र विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी ता.चिमूर, जि.चंद्रपूर
*Corresponding Author :-vitthalthawari@gmail.com

Communicated : 02.01.2023 | Revision :08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :-**
भारत हा नवदुर्गेची पुजा करणाऱ्या संस्कृतीतील स्त्री शक्तीचा देश आहे. प्रत्येक यशस्वी पुरूषांच्या मागे एक स्त्रीचा सहभाग असतो. या समाजात घडलेले अनेक महापुरूष स्त्री मुळे घडले. मुळातच महिलांमध्ये निसर्गाकडून काही देणग्या पुरूषापेक्षा जास्त आहे. स्त्रीमध्ये सहनशिलता, नाविन्यता, सौदर्याचीजाणीव, बचतप्रवृत्ती, संघप्रेरणा, स्मरणशक्ती हे गुण निसर्गाताच अधिक स्त्री श्रुजनशील आहे कारण निसर्गाने निर्मीतीचा अधिकार स्त्रीयांना दिला आहे. भारताच्या पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्री आज समाज व कुटूंबाच्या बंधनात अडकून पडली आहे. 'स्त्रीसक्षमीकरण' म्हणजे स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची, संघटीत करण्याची क्षमता निर्माण करणे, कृतीशिल कार्यक्रम घडवून आनणे, लोकसंपर्क, संस्थासंपर्क, आर्थिक व्यवहार इ. करण्याची क्षमता व आवड निर्माण होणे होय'. सत्तावंचित व संधीवंचित महिलांना कोणत्याही भेदाशिवाय प्रगती करण्याची संधी म्हणजे महिला सक्षमीकरण होय. महिला सक्षमीकरण म्हणजे व्यक्तीच्या अंगभूत क्षमताचा विधायक विकास होय.

समान गरजा असलेल्या व्यक्तींनी एकत्र येवून समान आर्थिक उद्दिष्टये व सामाजिक उद्दिष्टये साध्य करण्यासाठी एकाच प्रदेशातील व भागातील व्यक्तींनी एकत्र येवून समुह स्थापणा व वृद्धींगत करून स्वेच्छेने सहभागी होणे यालाच स्वयंसहाय्यता बचतगट म्हणतात.

बचत गटामुळे महिलांच्या सबलीकरणासाठी, आर्थीक विकासासाठी मोठीच मदत होणार आहे. महिलांनी आत्मविश्वासने मोठया प्रमाणात बचतगटात सहभागी होवून निरनिराळया बचतगटांची निर्मीती करून स्वत:चे सबलीकरण करून घेतले पाहिजे.

**बिजसंज्ञा :** सावित्रीबाई फुले आर्थीक विकास बचतगट खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतीकिकरण

**प्रस्तावना :**

भारत हा नवदुर्गेची पुजा करणाऱ्या संस्कृतीतील स्त्री शक्तीचा देश आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री चा सहभाग असतो असे म्हटले जाते. या समाजात घडलेले अनेक महापुरूष स्त्रीमुळे घडले. राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, मदर टेरेसा आणि इतरही अनेक कर्तृत्ववान महिलांनी या देशाचा नावलौकिक वाढविला आहे. राजमाता जिजाऊ होत्या म्हणून संस्कारमुर्ती व किर्तीवंत छत्रपती शिवराय घडले. सावित्रीबाई फुलेची साथ होती म्हणून ज्योतीबा फुले महात्मा झाले. आणि इतकेच नव्हे तर स्त्रिच्या संस्काराचा आणि सृजनांचा अविष्कार आहे. मुळातच महिलांमध्ये निसर्गाकडुन काही देणग्या पुरुषापेक्षा जास्त आहे. स्त्रिमध्ये सहनशिलता, नाविन्यता, सोंदर्याची जाणिव, बचत प्रवृत्ती, संघ प्रेरणा, स्मरणशक्ती हे गुण निसर्गत:च अधिक आहेत. स्त्री सृजनशील आहे कारण निसर्गाच्या निर्मितीचा अधिकार स्त्रियाना दिला आहे. स्त्री मुळातच सबला आहे. जरी संविधानाने स्त्री व पुरुष यांना समान अधिकार दिले असले तरी भारताचा पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्री आज समान व कुटुंबाच्या बंधनात अडकून पडली आहे.

२० च्या शतकाच्या उतरार्ध आणि २१ व्या शतकाच्या पुर्वाधातील दशक या कालखंडात आर्थिक व सामाजिक जगतात प्रचंड उलथापालथ झाल्याचे दिसून येते. खरतर या

कालखंडात मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात असे बदल झाल्याचे आपल्याला जाणवतात. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतीकिकरण या संकल्पनांनी एकूनच आर्थिक क्षेत्रावर प्रभाव टाकलेला आढळतो. विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेत लोकसंख्या हा महत्वाचा अडसर मानले जाते. परंतु बदलत्या आर्थिक प्रवाहानुसार मानवी स्त्रोताला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले असुन मोठया प्रमानावर उत्पादन क्षमता असलेल्या मानवी स्त्रोतांची उपलब्धता असणाऱ्या चिन व भारत या देशाकडे आश्वासक बाजारपेठ आणि आर्थिक महासत्तांचे दावेदार म्हणून पाहिले जात आहे. चीनची तर त्या दृष्टीने वाटचालही सुरु झालेली आहे.

या बदलत्या आर्थिक परिस्थितीत भारताचे नेमके काय स्थान आहे. आर्थिक दृष्टया संपन्नता प्राप्त करण्यासाठी भारताची नेमकी बलस्थाने कोणती? महासत्ता बनण्याचे आपले स्वप्न प्रत्यक्षात येणार की स्वप्नरंजनच ठरणार आहे? या दृष्टीने आपले काय नियोजन आहे? या बाबींचा उहापोह करतांना आपल्याला असे लक्षात येईल की, भारताची गणना सशक्त मानवी स्त्रोतांची उपलब्धता असणाऱ्या देशात होत आहे. विकसनशील देशाच्या विकासाकरीता आवश्यक असणारा तरुण वर्ग हे भारताच्या विकासातील बलस्थान आहे. .या ठिकाणी तरुण वर्गाच्या सोबतच भारतातील महिला हया मानवी स्त्रोताकडे लक्ष पुरविणे अत्यावश्यक आहे. भारतीय परंपरागत मानसिकतेने स्त्रियाचे क्षेत्र संकुचित केले आहे. आपल्या देशाच्या आर्थिक विकासात मोठया प्रमाणावर भर घालू शकणाऱ्या मोठया वर्गाचा आपण वापर केला नाही. परिणामी हा वर्ग आर्थिक प्रवाहात न येता अनुत्पादक घटक म्हणून अर्थव्यवस्थेतील ओझे म्हणून गणल्या गेला.

व्हिनेसा ग्रिफन यांच्या मते ‘स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रिच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची, संघटीत करण्याची क्षमता निर्माण करणे, कृतीशील कार्यक्रम घडवुन आणणे, लोकसंपर्क, संस्था संपर्क, आर्थिक व्यवहार इत्यादी करण्याची क्षमता व आवड निर्माण होणे होय’. सत्तावंचित व संधीवंचित महिलांना कोणत्याही भेदाशिवाय प्रगती करण्याची संधी म्हणजे महिला सक्षमीकरण होय. महिला सक्षमीकरण म्हणजे व्यक्तीच्या अंगभूत क्षमताचा विधायक विकास होय.

‘‘कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातुन आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रामध्ये महिलांना पुरुषाच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करुन देणे, विकासासाठी संधी उपलब्ध करुन देणे आणि स्त्री–पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात.’’

भारतात महिलांचे स्थान कुटूंबात दुय्यम समजले जाते. पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे कुटुंबातील सर्व निर्णय पुरुष घेतात. देशात स्त्रियांची सामाजिक, आर्थिक स्थिती काय? हया प्रश्नांचे उत्तर शोधतानां स्त्रियाचे साक्षरतेचे प्रमाण कमी, कुपोषण, आरोग्याचा सोयीचा अभाव, दर दहा हजार पुरुषामागे स्त्रियाचे कमी होणारे प्रमाण, हुंडाबळी, अन्याय–अत्याचार हेच निदर्शनास येते. स्त्रियांचे विकासाकडे पंचवार्षिक योजना काळात लक्ष दिलेले असले तरी ग्रामीण स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा खरा मार्ग स्वयं सहाय्यता बचत गटामार्फत उपलब्ध झालेला दिसतो. सहाव्या पंचवार्षिक योजना काळात ग्रामीण स्त्रियांकरीता विशेष प्रयत्न केले गेले. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ट्रायसेम आणि डवाका या कार्यक्रमाव्दारे महिलांच्या विकासासाठी मदत करण्यात आली. सातव्या पंचवार्षिक योजनेत देखिल स्त्रियांचे सामाजिक, आर्थिक स्थान उंचावण्यासाठी कार्यक्रम राबविण्यात आले. ते आजपर्यन्त सुरु आहेत. हया पंचवाषिक योजना काळात स्वयं सहाय्यता बचत गट आणि इतर संघटनाच्या

माध्यमातून स्त्रियांना अधिक उत्पादकतेच्या संधी उपलब्ध करुन देण्याचे ठरविले गेले.

**स्वयं सहाय्यता बचत गटाचा इतिहास –**

बाग्लादेशात गरिबीचे उच्चाटन करण्यासाठी प्रा. डॉ. महम्मद युनूस हे प्रयत्न करीत होते. अर्थशास्त्राचे सिध्दांत व ग्रामीण भागातील वास्तविक स्थिती यात विसंगती जाणवू लागली. छोटया रकमेचे कर्जही गरीब व्यक्तीच्या जीवनातील संघर्ष बदलवू शकतो.याचा अनुभव त्यानी घेतला. त्यानी बांबूपासुन टोपल्या बनविणाऱ्या कारागीरांच्या वस्तीत दहा महिलांचा बचत गट स्थापन केला. मात्र त्याला तारणाशिवाय कर्ज मिळू शकले नाही. तेव्हा प्रा. डॉ. महम्मद युनुस यांनी स्वत:च मदत केली. तारणाशिवाय कोणतीही बॅक कर्ज देवू शकत नाही त्याची त्यांना जाणीव झाली .१९८२ मध्ये त्यानी महिलांचे बचत गट स्थापन करण्यास सुरुवात केली. व हयाच महिलाच्या सहकार्याने १९८३ साली बांग्लादेश ग्रामीण बॅकेची स्थापना केली. या बॅकेतर्फ स्वयसहाय्यता बचत गटाचे कार्य सुरु आहे. जगातील सर्व राष्ट्रांनी बांग्लादेशाचा आदर्श घेवून स्वंयसहाय्यता महिला बचत गट निर्मीतीचे कार्य हाती घेतले. भारतातही अशा स्वयं सहाय्यता बचत गट स्थापनेस चालना मिळाली.

**स्वयंसहाय्यता बचत गट म्हणजे काय?**

स्वयं सहाय्यता म्हणजे स्वत:ची मदत स्वत: करणे, स्वय सहाय्यता गट म्हणजे स्वत:ची मदत स्वत: करणाऱ्या लोकांचा संघ किंवा संघटना होय .या गटाकडून स्वंय सहाय्यताकृती केली जाते. केवळ आर्थिक अडचणी सोडविण्यासाठीच नव्हे तर सामाजिक सांस्कृतिक कार्याचे आयोजन करण्यासाठी त्यातील अडचणी सोडविण्यासाठी देखील प्रयत्न केले जाते. परस्परांचे सहकार्य आणि सहभाग नेतृत्व व कर्तव्यासह सातत्याने प्रयत्नशिल व कार्यरत असणाऱ्या सदस्याच्या गटाला स्वयं सहायता गट म्हणता येईल.

एकाच गावातील, वस्तीतील, मोहल्यातील कमीत कमी १० व जास्तीत जास्त २० महिला एकत्र येवून स्वयंसहाय्यता बचत गटाची स्थापना करतात स्वेच्छेने सहभागी होणाऱ्या सभासदाला सभासदत्व दिले जाते. स्वत:ची बचत राशी घेवून येणे व गटाच्या कामासाठी वेळ देणे बंधणकारक केले जाते. सर्वासमोर चर्चा होवुन निर्णय घेतले जातात व त्या निर्णयाचा मान ठेवला जातो, पालन केले जाते. जात, धर्म, पंथ, भाषा यावरुन भेदभाव केला जात नाही व आर्थिक व्यवहाराच्या नोंदी ठेवल्या जातात.

**स्वयंसहाय्यता बचत गटाचे उद्देश –**

१) स्वयंसहाय्यता बचत गटामूळे महिलांच्या संघटना तयार होवून त्याच्यात एकतेची भावन वाढीस लागते.

२) स्वयं सहाय्यता बचत गटामुळे महिलाना नवीन ज्ञान प्राप्त होते.

३) स्वयंसहाय्यता बचत गटामुळे स्त्रियांना पोस्ट ऑफिस, बॅका, शासकीय कार्यालये इ ठिकाणी जाण्याची व बोलण्याची हिमंत प्राप्त होते.

४) स्वयसहाय्यता बचत गटामुळे महिलांचा सर्वागीण विकास होते.

५) स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिलात नेतुत्व निर्माण होते.

६) स्वयसहाय्यता बचत गटामुळे महिलांच्या कला गुणाचा विकास होवुन देशाच्या विकासाला हातभार लागतो.

**स्वयंसहाय्यता गटाव्दारे महिलांचे सबलीकरण :–**

समाजातील विषमता कमी करण्यासाठी विविध विकास योजना, चळवळी फोफावत आहे. आहेत. त्यातुन सबला या दृष्टीकोणातुन परिवर्तन होत आहे. सबला व्यक्ती सभोवतालीचे वातावरण बदलून शाश्वत विकास करतात. म्हणुन कमकुवत महिला घटकानां स्थायी स्वरुपात शाश्वत

आर्थिक स्त्रोत्र निर्माण केल्यास सबलीकरण होऊ शकते. स्वयसहायता बचत गटाव्दारे महिलाचे विविध स्तरावर सबलीकरण होत आहे.

—आर्थिक सबलीकरण

— सामाजिक सबलीकरण

— राजकीय सबलीकरण

महिला सबलीकरणाचे एक प्रभावी माध्यम म्हणुन बचत गटांना मान्यता मिळाली आहे. दारिद्रय निमूर्लनाचे साधन, परिवर्तनाचे माध्यम, स्त्री संवादाचे व्यासपीठ, महिलाच्या आत्मसन्मानाची पाऊलवाट, ग्रामीण विकासाचा मार्ग, गरीबाच्या आशेचा किरण, स्वयरोजगाराचा मार्ग अशा विविध महत्वपुर्ण भुमिका बचत गट पार पाडत आहे. बचत गटामुळे महिलामधील आत्मविश्वास वाढत आहे.

**स्वयसहायता बचत गट योजनेचा विकास —**

भारतात १९९२ मध्ये नार्बाडने स्वयसहायता बचत गटास गती दिली. तेव्हा १९९२ मध्ये भारतात २२५ बचत गट बॅकाशी जोडण्यात आले नाबार्ड नंतर १९९३ मध्ये रिझर्व बॅकेने बचत गटास मान्यता दिली. मार्च २००५ अखेर भारतात एकुण १६ लाख बचत गट होते. १९९३ ते २००५ पर्यत बचत गटातर्फे केल्या जाणाऱ्या कर्ज पुरवठयात रु ०.३ कोटीवरुन ६८.९८ कोटीपर्यत वाढझाली आहे.

अनेक ठिकाणी महिला एकत्रित येवुन स्वयं सहाय्यता महिला बचत गटाची स्थापना केली आहे. त्यांनी बॅकेकडुन वित्त सहाय घेवून छोटे छोटे व्यवसाय सुरु केले आहे. उदा पापड व्यवसाय, अगरबत्ती व्यवसाय, धोंगडी व्यवसाय, मेनबत्ती व्यवसाय दुग्ध व्यवसाय, बकरी पालन व्यवसाय झुनका भाकर व्यवसाय जि. प. प्राथमिक शाळेमध्ये खिचडी तयार करणे , वृक्ष लागवड इ.

**ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण :—**

**१) स्वयं सहाय्यता बचत गटाची स्थापना :—**

भारतात ग्रामीण भागात स्वयं सहायता बचत गट अधिक स्थापण झालेले आहेत. महिला व बचत गटाची स्थापना हा ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणाचा पहिला टप्पा आहे. त्यामुळे महिलांची बचत करण्याची वृत्ती वाढीस लागते. प्रत्येक बचत गट आपले आर्थिक व्यवहार करण्यासाठी बॅकेत आपले खाते काढतो. बचत गटातील जमा रक्कम बॅकेत जमा करण्याचे कार्य बचत गटातील सर्वच सभासदांना आळीपाळीने करावे लागत असल्यामुळे त्यांना बॅकेच्या कार्याची कल्पना येते. कर्ज घेणाऱ्या सभासदाने प्रथम गटाच्या अध्यक्षांच्या नावाने अर्ज करावा लागतो. सभासदाला २ किंवा ३ टक्के दराने कर्ज उपलब्ध करून दिले जाते. ही कर्जाची उचल बॅकेकडून केली जाते. व कर्जाची परतफेड देखिल नियमितपणे केली जाते. बचत गटाचे हिशेब ठेवणे, चेकने कर्ज देणे, बचत खात्यात रक्कम जमा करणे ही सर्व कार्य महिलांकडून केली जातात.

**२) कर्जाच्या आधारे उद्योगांची स्थापणा :—**

**अ) सेवा उद्योग :—**

भाजी व फळे विकणे, बांगळया व सौदर्य प्रसाधनाचे दुकान चालविणे, लॉड्री कपडे, शिलाई मशिन, किराणा दुकान चालविणे, दुध विक्री, ब्युटीपार्लर, पाळणाघर, किंवा बालमंदिर चालविणे असे सेवा आधारीत उद्योग महिला करतात.

**ब) व्यापार उद्योग :—**

यात धान्य विक्री, दागीने विक्री, भांडे, चिनीमातीच्या वस्तू, टोपल्या, झाडू, अवजारे विक्री, रेडीमेट कपडे, वूलन कपडे, पुस्तके विक्री, यासारखे उद्योग बचत गटातील महिला करतात.

**क) निर्मीत उदयोग —**

तेल निर्मीती, डाळ निर्मीत, मिरची मसाले, हळद पावडर, सर्व प्रकारचे लोणचे चटण्या, पापड, कुरडया, चिप्स,

लग्नाचे रुखवंत, कापडावरील विणकाम, भरतकाम, पत्रावळी, मेहंदी, रांगोळी, अगरबत्ती, कांडप मशिन साडया पिको फॉल करणे यासारखे निर्मीत वस्तुचें उदयोग महिला करतात.

**३) सक्षमीकरणाला विकेंद्रीकरणाची मदत –**

ग्रामीण भागातील महिला बचत गटानी उत्पादीत केलेल्या वस्तुची विक्री चागल्या प्रकाराने व्हावी यासाठी नाबार्ड कडून अर्थसहाय दिले जाते. जागा त्याचे भांडे नोकरीचा पगार वस्तु प्रदर्शने मालासाठी गृह ,मोजमापाचे साहित्य ,कच्चा माल इ साठी नाबार्डने अर्थसहाय केले आहे. त्यामुळे महिलाच्या उदयोगाची जलद भरभराहट झाली. मोठया प्रमाणात महिला सभाधिट झाल्या. बॅक व्यवहाराशी त्याची तोडंओळख झाली. वस्तुच्या विक्रीचा व बाजारपेठेचा प्रश्न सुटला व सबलीकरणाकडे वाटचाल झाली.

**४) निर्णय क्षमतेचा विकास –**

महिला बचत गटाची स्थापना व या बचत गटाच्या वारंवार होणाऱ्या बैठका. बैठकीत

विविध विषयावर होणारी चर्चा व त्यातुन निर्णय घेण्याची महिलाची क्षमता वाढत गेली. सभोवतालचा परिसर आरोग्य शिक्षण, पिण्याचे पाणी, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, ,अनिष्ट प्रथांचे निर्मूलन, दारुबंद हुडाबंदी बालविवाहाला विरोध इ. महत्तपूर्ण विषयावर स्त्रियानी निर्णय घेतले. यावरुन महिला सबल झाल्या हे स्पष्ट होते.

महिलाचा कौटुबि आर्थिक, सामाजिक, राजकीय विकासात बचत गटाची भुमिका प्रभावी ठरत आहे. महिलाच्या बचतीच्या सवयीचा महिलाना लाभ होत आहे. बचत गटाबाबत शासकीय योजनेमुळे महिलाना आर्थिकतेच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत. गटातील महिलानी कर्जाची परतफेड केल्याने व कर्जातुन अनेक छोटे छोटे व्यवसाय उभारल्याने बॅकेचा विश्वास संपादन केला आहे. ग्रामीण महिलांच्या व्यक्तीमत्वातील अनेक गुणवैशिष्टयांचा विकास झालेला आहे. कौशल्य क्षमता, आत्मविश्वास,, आर्थिक व्यवहार, बॅकेचे व्यवहार, सामाजिक वागणूक नियोजन, व्यवसायाचे कसब इ. गुंणाचा विकास झाल्याने त्यांचा सामाजिक दर्जा उंचावला आहे.

बचत गट हा दारिद्रय निर्मूलनाचा प्रभावी मार्ग आहे. ग्रामीण भागातील कुंटुबाला द्रारिद्रयातुन मुक्त होण्यासाठी महिलाच्या सामाजिक जिवनात परिवर्तन करण्यासाठी बचत गटाची चळवळ गतिमानतेकडे वाटचाल करत आहे. बचतीच्या माध्यमातून ग्रामीण महिलाचा जीवनस्तर उंचावण्यासाठी, व्यवसायातुन आर्थिकता मिळविण्यासाठी, प्रेरणा देणारा बचत गट हा आज प्रेरक ठरत आहे. सामाजिक उपक्रम गटाच्या माध्यमातुन राबवून सामाजिक विकासाला चालना देण्याचे कार्य करत आहे. बचत गटातील महिलांचे वेगवेगळे पदार्थ, वस्तु बनवुन प्रदर्शनात नावलौकीक मिळवला आहे. बाजारपेठेची मागणी व पुरवठा हा नियम माहित झाल्याने अर्थशास्त्रीय सिध्दांतातुन व्यवसायात मार्ग क्रमण करत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेतील ५० टक्के आरक्षणाच्या फायदा घेवुन राजकीय पदावर मिळालेल्या संधीलाच घेवून सक्षमतेने राजकीय पद साभाळताना दिसत आहे. महिला मेळावे, शिबीरे, व्यावसायीक प्रशिक्षणात मत मांडणे इ. चा फायदा झालेला आहे महिला सक्षमीकरण बचत गटाचे योगदान महत्वपूर्ण असलेले दिसते.

बचत गटाची चळवळ ही महिलांनाच सक्षमक करण्याची आणि खरोखर अत्यंत यशस्वी ठरलेली अशी मोठी व्यापक चळवळ आहे. आर्थिक दृष्टया कमकुवत गटातील लघुव्यवसायीका साठी कर्ज पुरवठा होण्याचे बचत गट हे एक साधन आहे. एकत्रितरित्या तयार झालेला गट त्या गटांनी, केलेली बचत गटाअंतर्गत तारणासहित कर्जपुरवठा, वस्तुरूप तारणा ऐवजी सामाजिक आणि समुहाचे तारण

लोकशाही कार्या पध्दतीने तयार झालेले माहिलांचे अंसख्य बचत गट हे महिलांच्या सक्षीमीकरणाचे गरीबीविरूध्द लढण्याचे आणि सावकारी पाषातून मुक्ततेचे एक प्रभावी हत्यार आहे. या चळवळीमुळे स्त्रियांमध्ये जागृती निर्माण होऊ लागले. स्त्रिया निरनिराठया क्षेत्रात चमकु लागल्या, पुढे येऊ लागल्या स्त्रि चळवळीनेही जोर धरला आणि स्त्रिया सक्षम होण्यास सुरूवात झाली.

**निष्कर्ष :—**

आपल्या कुंटूबासाठी काही अर्थाजन करून स्वयंरोजगार कसा करता येईल इतक्याच मर्यादीत विचाराने जरी आपण माहिला बचत गट यशस्वीपणे चालवू शकलो तरीसुध्दा या स्पर्धेच्या युगात महिलांच्या सबलीकरणासाठी, आर्थिक विकासासाठी मोठीच मदत होणार आहे. बचत गट दुर्बलांना सबळ करण्याचे सामर्थ्य राखून आहे. तेव्हा भारतीय संस्कृतीने व समाजाने दुर्बल ठरणाऱ्या महिलांच्या सबलीकरणासाठी बचत गट चळवळ संजीवनी शक्तीचे काम करू शकते ही गोष्ट आपण जाणून घेतली पाहिजे. म्हणून महिलांना आत्मविश्वासाने मोठया प्रमाणावर बचत गटात सहभागी होवून निरनिराळया बचत गटाची निर्मिती करून स्वत:चे सबलीकरण करून घेतले पाहिजे.

**संदर्भ :**

अर्थमंथन :— (मराठी अर्थशास्त्र परिषद नोव्हे २०१०)

प्रा.एम.यु मुलांनी : स्वयं सहाय्यता बचत गट व महिला सक्षमीकरण, डायमंड पब्लीकेशन्स डिसेबंर २००६

दै लोकमत :— दि. ८ सप्टेंबर २०१९

योजना मासिक :— सप्टेंबर २०१६

अर्थविश्व — नॅशनल रिसर्च जर्नल— जाने—जुन २०१४

नवभारत मासिक :— जानेवारी २०१३

http:// gaganbharari.com

mr.m.vikipedia.org